सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo-9422404740

| बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ | अंक - २०२ | बुधवार, दि.३० जुलै २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 | Issue - 202 | Wednesday, Dt.30 July 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4 |


## आल इंडिया पसमांदा मुस्लिम समाज प्रदेश कार्यकारिणी अध्यक्षपदी सादिक मंसुरी यांची निवड



सायं.दै.लोकदिशा । पाटोदा

पाटोदा शहरातील सादिक हनीफ शेख (मंसुरी ) यांची आल इंडिया पसमांदा मुस्लिम समाज प्रदेश कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली सादिक हनीफ शेख यांनी अली अजिजी यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय पिंजारी - मंसुरी समाज सेवा संघटनेच्या मराठवाडा विभागीय अध्यक्ष म्हणून त्यांनी पिंजारी व ओबीसी समाजासाठी काम केलेले आहे.याच कामाची दखल घेत त्यांना आल इंडिया पसमांदा मुस्लिम समाज या राष्ट्रीय संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.शाकीर अली मंशुरी यांनी निवड केली या निवडीबद्दल सादिक मंसुरी यांचे सादिक शेख यांच्या सोबत सतत समाजासाठी दिवस रात्र योगदान देणारे राज्य अध्यक्ष राजु हाजी इब्राहिम मंसुरी नगरकर यांच्यासह सर्वत्र अभिनंदन व शुभेच्छा शुभेच्छा वर्षाव होत आहे.

# शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाचा वाद

## निर्णय आणखी पुढे जाण्याची शक्यता वाढली; आता १० सप्टेंबर नंतरच निर्णय

मुंबई - शिवसेना पक्ष आणि चिन्हाचा वादावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या संदर्भात आगामी २० ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालय अंतिम निकाल देण्याची अपेक्षा होती. मात्र, आता या प्रकरणाचा निकाल पुन्हा एकदा लांबीवर पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. वास्तविक या प्रकरणाचा निकाल देणारे न्यायमूर्ती सूर्यकांत हे आता सर्वोच्च न्यायालयाच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या घटना पीठामध्ये असल्यामुळे शिवसेना चिन्ह बाबतीत असलेल्या प्रकरणाचा निर्णय आणखी पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

त्याबद्दल मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्या वादामध्ये राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाकडे सल्ला मागितला आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने घटना पीठाची स्थापना केली आहे. हे घटना पीठ राष्ट्रपतींनी मागितलेल्या सल्ल्यावर १९ ऑगस्ट पासून सुनावणी करणार आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत हे देखील या घटना पीठाचा एक भाग आहेत. त्यामुळे आता शिवसेना वादाचा निकाल आणखी काही दिवस पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या पीठासमोरच शिवसेना चिन्हाचा आणि पक्षाचा अंतिम निर्णय होणार आहे. मात्र न्या. सूर्यकांत आता घटनापीठाचे सदस्य असल्याने शिवसेनेची सुनावणी लांबणीवर पडली आहे. घटना पिठाची सुनावणी ही १९ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या कालावधीत होणार आहे. त्यामुळे या कालावधीत शिवसेना प्रकरणावर कोणताही निर्णय होण्याची शक्यता फारच कमी आहे. त्यामुळे आता या प्रकरणावर १० सप्टेंबर नंतर निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### धनुष्यबाण हे जुने चिन्ह गोठवून नवे चिन्ह देण्याची मागणी

आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे धनुष्यबाण हे जुने चिन्ह गोठवून शिंदे यांच्या गटाला नवीन चिन्ह देण्याची मागणी उद्धव ठाकरे गटाने केली आहे. मात्र आता ही सुनावणी लांबणीवर पडली आहे. त्यामुळे सध्यातरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शिवसेना पक्ष हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे हेच वापरणार असल्याचे दिसून येते.

शिवसेना

# बीड जिल्ह्यात ७३.६६% शेतकऱ्यांनी घेतला फार्मर आयडी

## प्रशासनाचे शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढून घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी । बीड

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या फार्मर आयडी नोंदणी मोहिमेला बीड जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे . जिल्ह्यातील एकूण ६,२१,५१६ पात्र शेतकऱ्यांपैकी ४,६१,८८९ शेतकऱ्यांनी आपली फार्मर आयडी नोंदणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे . हे प्रमाण ७३.६६ टक्के इतके असून , उर्वरित शेतकऱ्यांनी तातडीने आपली नोंदणी करून घ्यावी , असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन केले आहे . २४ जुलै रोजी सर्व महसूल अधिकाऱ्यांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली होती यावेळी अपर जिल्हाधिकारी सर्व उपजिल्हाधिकारी तहसीलदार उपस्थित होते . या बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी यांनी उर्वरित शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तात्काळ काढून घेण्याबाबत आवाहन केले होते .




यासंदर्भात बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे - सोनवणे आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी संयुक्तपणे जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना लवकरात लवकर फार्मर आयडी काढण्याचे आवाहन केले आहे .या विषयाच्या संदर्भाने आणि इतर विषयांबद्दल बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी , सर्व ग्राम महसूल अधिकारी , सर्व कृषी सहाय्यक यांची संयुक्त बैठक सामाजिक न्याय भवन येथे घेतली . यावेळी नुकताच पदभार घेतलेले गटविकास अधिकारी अशोक राठोड , तालुका कृषी अधिकारी अशोक साळी व इतर अधिकारी उपस्थित होते . यावेळी बोलताना तहसीलदार शेळके यांनी नमूद केले की फार्मर आयडी ही शेतकऱ्यांची अधिकृत ओळख आहे . याशिवाय कोणत्याही शासकीय शेतीसंबंधित योजनेचा लाभ घेता येणार नाही . यामध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान योजना , नमो सन्मान निधी , पीक विमा , पीक कर्ज , नैसर्गिक आपत्ती भरपाई , धान खरेदी , तसेच पंचायत समिती आणि महसूल विभागाच्या विविध योजनांचा समावेश आहे .फार्मर आयडीसाठी शेतकऱ्यांना आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रावर ( सी एस सी ) जावे लागेल . यासाठी आधार कार्ड, ७/१२ किंवा ८अ उतारा आणि आधार लिंक असलेला मोबाईल नंबर आवश्यक आहेत .जिल्ह्यातील धारूर तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ८४.२१ टक्के शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून , वडवणी तालुक्यात हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ६२.७२ टक्के आहे . बीड , आष्टी , केज , गेवराई , पाटोदा आदी तालुक्यांमध्येही नोंदणीचे प्रमाण ७५ टक्क्यांहून अधिक आहे.प्रशासनाने स्पष्ट केले आहे की , शेतकऱ्यांनी जर फार्मर आयडी काढले नाही तर भविष्यात कोणतीही सरकारी मदत किंवा योजना त्यांना मिळणार नाही . त्यामुळे ही नोंदणी हक्काची आणि गरजेची असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे .

## धारूर येथेल देवस्थान इनामी जमीन प्रकरणाला जबाबदार कोण ?

### वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी लक्ष द्यावे :- सय्यद सलीम बापू

प्रतिनिधी । बीड

**जिल्हाभरात देवस्थानी इनामी जमिनीची अवैध खरेदी विक्री करणारी भू माफिया टोळी सक्रिय असून या टोळी कडून महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना हाताशी धरून अवैध प्रकारे फेरफार करून जमीन लाटण्याचे प्रकार समोर आले असून असेच काही प्रकार धारूर येथेही घडले आहे.**

धारूर येथे मंदिर,मस्जिद,दर्गाह,ईदगाह,अशुरखाना,कब्रीस्तान इत्यादी देवस्थानची मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांतर्गत येणारी इनामी जमीन असून या जमिनीवर स्थानिक नेते आणि भू माफिया यांचा डोळा असून या वक्फ मंडळांतर्गत येणाऱ्या देवस्थान मालकी इनामी जमिनी वर स्थानिक नेते आणि भूमाफिया यांनी धारूर येथील तहसीलदार,मंडळाधिकारी,तलाठी व इतर महसूल कर्मचारी आणि धारूर नगरपरिषद येथील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संगणमत करून अवैध प्रकारे फेरफार व एन ए.लेआउट करून जमिनी लाटण्याचे प्रकार समोर आले आहे.



या प्रकरणावर आंबेडकरी विचार मोर्चा आणि तहरीक-ए-इनाम संघटनेच्या वतीने वेळोवेळी रिष्ठ अधिकार्यांना निवेदने देण्यात आली होती.या सर्व प्रकरणावर एक चौकशी समितीही गठित करण्यात आली होती या चौकशी समितीने काय चौकशी केली ? याचे उत्तर अध्याप आम्हाला मिळालेले नाही.पण धारूर येथील देवस्थान इनामी जमीन प्रकरण उघडकीस आणणाऱ्यांवर काही महिलांना हाताशी धरून खोटे फिर्यादी दाखल करण्याचे प्रयत्न स्थानिक नेते आणि भूमाफिया करीत आहे. या सर्व प्रकरणावर पोलीस अधीक्षक साहेब आणि धारूर येथील पोलीस निरीक्षण साहेबांनीही विशेष लक्ष देण्याचे गरजेचे आहे.

धारूर येथील तहसीलदार आणि इतर महसूल अधिकारी यांच्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा कसलाही अंकुश राहिला नाही ते म्हणतील तोच कायदा अशी गत झाली आहे.धारूर येथे मोठ्या प्रमाणात देवस्थान इनामी जमिनीचे अवैध फेरफार झाले असून व त्याचप्रमाणे गायरान जमिनीचेही फेरफार व वेद खरेदी-विक्री करण्याचे प्रकरण सुद्धा समोर आली आहे.तरी धारूर येथील देवस्थान इनामी जमिनी प्रकरणाला जबाबदार कोण या ? सर्व प्रकरणावर महाराष्ट्र राज्य व मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी लक्ष देऊन प्रकरणातील संबंधित दोषी अधिकारी कर्मचारी व भूमाफियांवर तात्काळ चौकशी करून दोषींवर वक्फ अधिनियम १९९५ कलम ५२ (१) (अ) प्रमाणे गुन्हे दाखल करावे अशी मागणी आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या पत्रकातून केली आहे.

## माजलगाव करा ना होतंय शेवाळ युक्त व गढूळ पाणी पुरवठा

### नागरिकाच्या जीवाशी खेळ ब्लिचिंग पावडरचा वापर नसल्याने पाण्यात येतो दुर्गंध वास

प्रतिनिधी । माजलगांव

माजलगाव येथील नगरपालिकेने दर महिन्याला पाणीपुरवठ्यावर लाखो रुपये खर्च करून ही शहरवासी यांना मागील पाच-सहा महिन्यापासून अशुद्ध पाणीपुरवठा केला जात आहे सध्या या पाण्यात पालापाचोळ्यासह शेवाळ येऊ लागले आहे बिलचींग पावडरचा वापर होत नसल्याने पाण्याला दुर्गंधी वास येत आहे यामुळे माजलगाव शहरवासीयाच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याने नागरिकाच्या जीविताशी खेळणाऱ्या वर कारवाईची मागणी होत आहे माजलगाव येथील नगरपालिकेवर गेल्या अनेक वर्षापासून प्रशासक असल्याने व सध्या प्रभारी प्रशासक नियुक्ती केल्याने नगरपालिका चा कारभार बेभरोसे सुरू आहे येथील कर्मचारी प्रशासकाचे नियंत्रण नसल्याने माजलगाव नगरपालिकेत कर्मचारी कधीही येतात व कधीही जातात यामुळे अनेकांचे कामे रगडलेली आहेत नगरपालिकेकडून शहरातील नागरिकांना वेळेत पाणी मिळावे यासाठी पाणीपुरवठावर महिन्याला आठ लाख रुपये खर्च करून टेंडर काढ ण्यात आले आहे या टेंडर चालकाने शहराला वेळेत व शुद्ध पाणी द्यावे अशी अट आहे परंतु संबंधित ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे माजलगाव शहराला सहा ते आठ दिवसाला पाणीपुरवठा होत आहे हे पाणी शुद्ध देण्याऐवजी नळाला पूर्णपणे अशुद्ध पाणी येत आहे या पाण्याला फिल्टर केले जात नसल्याचेही सांगितले जात आहे पाण्यात ब्लिचिंग पावडर व तुरटीचा किंचितही वापर केला जात नसल्याने पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचारी



यांनी सांगितले यामुळे शहरात नळाद्वारे येणारे पाणी पूर्णपणे अशुद्ध शेवाळयुक्त असून पालापोचोळाही पाण्यात येत आहे हे पाणी पिताना अक्षरशः दुर्गंध वास येत असल्याने पाणी पिण्यासाठी हातात घेतलेला गिलास तसाच ठेवावा लागतो नगरपालिकेचे स्वच्छता व पाणीपुरवठा अभियंता हे मागील अनेक वर्षातून या टेंडर धारकावर मेहरबान असून त्यांचा कारभाराची चौकशी करावी अशी मागणी विविध संघटनेने आतापर्यंत अनेक वेळा केलेली आहे.

लिकेज कडेही माजलगाव नगरपालिकेचे दुर्लक्ष

शहरवासी यांच्या आरोग्याचा धोका निर्माण झालेला असताना माजलगाव नगरपालिका प्रशासनाचे जाणून बुजून दुर्लक्ष होत आहे शहरात जागोजागी असलेले लिकेज काढण्याचे काम या टेंडर मध्ये असताना शहरातील एकही लिकेज काढले नसल्याचे सांगितले जात आहे या पाणीपुरवठा टेंडर धारक स्वच्छता व पाणीपुरवठा अभियंता यांचे अभय असल्याचे माजलगावच्या नागरिकातुन बोलले जात आहे.

## गोवंश हत्याबंदी (सुधारीत) कायदा २०१५ रद्द करणे बाबत चे निवेदन देताना समस्त कुरेशी समाज बाधव, आदी

प्रतिनिधी । बीड

गोवंश हत्याबंदी (सुधारीत) कायदा२०१५ रद्द करणे बाबत. तसेच तथाकथीत गोरक्षकाकाकडून होत असलेली अडवणूक व कायदा हातात घेऊन चाललेली लुटमार अत्याचार ताबडतोब बंद होणे बाबत. गुरुवार दि. ३१ जुलै रोजी २ ते ५ या वेळेत तहसील कार्यालय भूम समोर धरणे आंदोलन करणे बाबत चे निवेदन भूम शहर व तालुका कुरेशी समाज, अल्पसंख्यांक समाज, शेतकरी, शेतमजूर यांनी तहसिलदार यांना दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, भूम शहर व तालुका कुरेशी समाज, अल्पसंख्यांक



समाज,शेतकरी, शेतमजूर यांच्यावतीने दिनांक ३१ रोजी २ ते ५ या वेळेत तहसील कार्यालय भूम समोर धरणे आंदोलन करत आहोत. गोवंश हत्याबंदी (सुधारीत) कायदा २०१५ रद्द करणे बाबत. तसेच तथाकथीत गोरक्षकाकाकडून होत असलेली अडवणूक व कायदा हातात घेऊन चाललेली लुटमार अत्याचार ताबडतोब बंद होण्यासाठी भूम शहर व तालुका कुरेशी समाज, अल्पसंख्यांक समाज, शेतकरी, शेतमजूर यांच्या वतीने आंदोलन करण्यात येत आहे. असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी समस्त कुरेशी समाज बांधव शेतकरी शेतमजूर उपस्थित होते.

## संस्थेच्या सचिवच्या मनमानी कारभाराला गावकरी वैतागली आपण यापुढे निष्क्रिय

# संस्थेसूची कार्यमुक्त करण्यासाठी आंदोलन करण्यात येणार आहे जिल्हा परिषद बीड या ठिकाणी देखील

## ११ ऑगस्टपासून गटशिक्षणाधिकारी कार्यालयावर ठोक आंदोलन निश्चित

प्रतिनिधी । धारूर

शहरातील मिलिया प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक वर्ग व मुख्याध्यापक यांच्याकडून शाळा व्यवस्थापन समितीची स्पष्टपणे अवहेलना करत सकाळी १०.०० ते सायं. ४.०० पर्यंत शाळा चालविण्याचे शासनाचे निर्देश असतानाही शाळा स्थानिक गरजांनुसार न भरता शिक्षकांच्या मर्जीप्रमाणे चालवली जात असल्यामुळे विद्यार्थी व पालक यांचे शैक्षणिक, मानसिक आणि आरोग्याचे मोठे नुकसान होत असून, मुख्याध्यापक कायमस्वरूपी मुख्यालयात वास्तव्य करत नसल्याने शिक्षक वेळेवर उपस्थित राहत नाहीत व शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता खालावली असून, पालकांच्या वारंवार तक्रारी असूनही याबाबत कोणतीही कारवाई होत नसल्याने पालक वर्गात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे, तसेच या शाळेच्या कारभारावर लक्ष ठेवण्यासाठी आणि योग्य शिस्त निर्माण करण्यासाठी शासनाने जे शाळा व्यवस्थापन समितीचे अस्तित्व ठेवले आहे, ती समिती केवळ नावालाच असून प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत तिची कुठलीही भूमिका राहिलेली नाही, परिणामी शिक्षक वर्ग शासनाच्या नियमांना बगल देत आपापल्या सोयीप्रमाणे शाळा भरवतो, विद्यार्थ्यांची उपस्थिती अत्यल्प राहते, शिक्षणाचे नुकसान तर होतेच परंतु गावातील पालकांमध्ये शासन व्यवस्थेप्रती असंतोष वाढीस लागतो, याशिवाय अशा बेजबाबदार कारभारामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उदासीनता निर्माण होत



असून अनेक विद्यार्थी शाळा सोडून देण्याच्या विचारात आहेत, तरी पालकांनी आता एकत्र येऊन ठरवले असून या शिक्षण व्यवस्थेत सुधारणा न झाल्यास व मुख्याध्यापक यांनी मुख्यालयात वास्तव्य करत नियमित हजेरी न लावल्यास तालुका गटशिक्षणाधिकारी, तहसील कार्यालय व पोलीस ठाणे यांच्यामार्फत जोरदार निवेदनाद्वारे आंदोलन उभारले जाईल, शाळेच्या कारभारावर निगराणी ठेवण्यासाठी नव्याने सक्षम शाळा व्यवस्थापन समिती गठीत करण्यात यावी, मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग यांना शाळेच्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहण्याबाबत स्पष्ट आदेश देण्यात यावेत, शाळेच्या सध्याच्या कार्यप्रणालीचा आढावा घेण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी शालेय शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी शाळेला प्रत्यक्ष भेट देवून पालक व विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे, जेणेकरून शाळेतील शिस्त पुन्हा पूर्ववत होईल, अन्यथा २८ जुलै २०२५ रोजी दिलेल्या निवेदनाप्रमाणे सर्व पालक संघटितपणे शासनाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करणाऱ्या शाळा व्यवस्थापन व शिक्षकवर्गाविरुद्ध तीव्र शासकीय लढा उभारून योग्य न्याय मिळवण्यासाठी आंदोलन, मोर्चा, धरणे आंदोलन, प्रसंगी न्यायालयीन दाद घेण्यासही मागेपुढे पाहणार नाहीत, याशिवाय गावपातळीवर समन्वय समिती स्थापन करून शाळेतील घडामोडींची नोंद ठेवली जाईल, शासनाने जर वेळेवर निर्णय घेतला नाही तर हा प्रश्न अधिक गंभीर स्वरूप धारण करेल, शाळेतील निष्काळजीपणा व बेजबाबदारीमुळे शासनाच्या सर्व शिक्षा अभियानासही अपयश येऊ शकते, म्हणून याप्रश्नी तातडीने शाळेच्या वेळेत नियमितपणा आणण्यासाठी, शिक्षकांच्या उपस्थितीसाठी शिस्त लावण्यासाठी आणि पालकांच्या सहभागाने चालणारी पारदर्शक शैक्षणिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत, असे स्पष्ट नमूद करून हा अर्ज शिक्षण विभाग, जिल्हा प्रशासन, तहसील कार्यालय व पोलिस प्रशासनाकडे सादर करण्यात आला आहे, ज्यात पालक वर्गाच्या सहीसकट निषेध नोंदवण्यात आला असून शासनाने जर पालकांच्या या मागण्यांकडे डोळेझाक केली, तर पालकही आता शांत बसणार नसून शाळेतील शिक्षकांच्या मनमानीविरोधात आवाज बुलंद करून मुलांच्या भविष्याची लढाई अंतिम टप्प्यापर्यंत नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.



## राष्ट्रवादी काँग्रेसच्या बीड जिल्हा सरचिटणीस पदी बप्पासाहेब घुगे यांची फेरनिवड निवड

प्रतिनिधी । बीड

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( अजित पवार गट )च्या बीड जिल्हा सरचिटणीस पदी मा. बप्पासाहेब घुगे यांची फेर निवड करण्यात आली आहे. ही निवड त्यांचे काम पाहता पक्ष करिता तळमळ धडपड पाहता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून एकनिष्ठता तसेच आचरण व विचाराद्वारे समाजात पक्षाच्या पद प्रतिष्ठेची जपवणूक व जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कायम अग्रेसर असतात याचीच एक दखल घेऊन बप्पासाहेब घुगे यांची बीड जिल्हा सरचिटणीस पदी फेरनिवड करण्यात आली आहे. ही निवड प्रदेशाध्यक्ष मा. खा. सुनीलजी तटकरे यांच्या आदेशाने माजी कृषिमंत्री.आ.धनंजयजी मुंडे,बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, युवा नेते योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत माजी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देत बप्पासाहेब घुगे यांची बीड जिल्हा सरचिटणीस पदी फेरनिवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे बप्पासाहेब घुगे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सवास हजारोच्या संख्येने उपस्थित रहा – मानवी हक्क अभियान

## कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.बाळासाहेब आंबेडकर तर उद्घाटक प्रा.डॉ.मिलिंद आवाड याची प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी । माजलगांव

तळागाळातील समाजातील तरुणांनी डॉक्टर, वकील, पोलीस, कलेक्टर झाले पाहिजे ही संकल्पना उराशी बाळगून समस्त दलित चळवळीच्या एकेकाळी पाठीचा कणा राहिलेल्या दिवंगत कर्मवीर एकनाथरावजी (जीजा) आवाड यांच्या विचार धारेचा समाज घडविण्याचा वसा अंगीकृत करून समाजाला समविचारी विचार धारेशी जोडण्याचे काम करत असलेले मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष प्रा.डॉ. मिलिंद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी हक्क अभियान बीड जिल्हा शाखा माजलगाव आयोजित

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सव सोहळा १ ऑगस्ट रोजी ठिक २ वाजता वैष्णवी मंगल



कार्यालय माजलगाव येथे पार पडत आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर भूषवणार आहेत. तर उद्घाटक म्हणून दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू



विद्यापीठाचे प्राध्यापक तथा मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद आवाड हे असणार आहेत.

या कार्यक्रमासाठी आमदार प्रकाश दादा सोळंके, मा.आ मोहनराव सोळंके , मा.आ. राधाकृष्ण होके पाटील , मा.आ. डी.के. देशमुख, मोहनराव जगताप, बाबुराव पोटभरे , ओमप्रकाश शेटे, जयसिंग सोळंके , जयदत्त नरवडे,सचिन उजगरे, उमेश काका मोगरेकर,प्रा.अर्जुन तनपुरे, नितीन दादा नाईकनवरे, श्रीहरी मोरे , सहाल भैय्या चाऊस, नानासाहेब घोडके, प्रभाकर साळेगावकर ,धम्मानंद साळवे, अरुणराव राऊत ,अविनाश तात्या जावळे , डॉ. ज्ञानेश्वर गिलबीले ,डॉ. प्रकाश आनंदगावकर, दयानंद स्वामी , शिवाजी सुतार, डॉ. दिनकर मस्के अरुण इंगळे, कचरु तात्या खळगे, मनमोहन कलंत्री ,कॉ. दत्ता डाके, तुकाराम येवले ॲड. तथागत कांबळे , मोहन जाधव ,गंगाभिषण थावरे ,भिमराव नाडे ,आंकुश जाधव,अजय शिंदे,विजय दादा साळवे,ॲड. नारायण गोले,भारत तांगडे ,ॲड. डोंगरदिवे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तरी या सोहळ्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मानवी हक्क अभियान बीड जिल्हा शाखा माजलगाव व जयंती महोत्सव समिती २०२५ आयोजक : राजेश क्षिरसागर, मधुकर कांबळे, रमेश गवळी, बंडु लोखंडे, बाबासाहेब थोरात, महादेव उमाप, कचरू कांबळे,पांडुरंग घडसिंगे, बंडु खंडागळे, संदिप वाघमारे, विष्णु मुजमूले, बबन खंडागळे, प्रल्हाद दळवी, छगन क्षिरसागर, आप्पाराव भारस्कर, राधे कांबळे, भारत जाधव, रमेश जाधव, आप्पाराव मुजमूले, किशन लोखंडे, परमेश्वर अडागळे, अनिकेत वाघमारे, कपिल अडागळे, बाबासाहेब मुजमूले, राहुल आवाड, प्रल्हाद कांबळे, राजेश थोरात, विनोद गायकवाड, तुळसीराम आवाड, अक्षय गवळी, महादेव अडागळे, अशोक थोरात, प्रकाश थोरात, बळीराम कारके, कपिल आडागळे, धोंडराम हातागळे, मारोती भिसे यांच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे.

# लोकशाहीर डॉ.आण्णा भाऊ साठे जन्मोत्सव निमित्त, त्यांच्या जीवनप्रवासाचे संकलन – आकाश कांबळे

प्रतिनिधी । तलवाडा

साहित्यरत्न डॉ.आण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव साठे व आईचे नाव वालुबाई साठे होते. अण्णाभाऊ हे शाळेत शिकलेले नाहीत, ते केवळ दीड दिवस शाळेत गेले नंतर तेथील सवर्णाद्वारे होणाऱ्या भेदभावामुळे त्यांनी शाळा सोडून दिली. त्यांनी दोन लग्न केली होती त्यांची पहिली पत्नी कोंडाबाई साठे तर दुसरी जयवंता साठे ह्या आहेत. त्यांना एकूण तीन अपत्य होती – मधुकर, शांता, आणि शकुंतला. त्यांचे शालेय शिक्षण झालेले नाही, तरीसुद्धा त्यांनी प्रयत्नपूर्वक अक्षर ज्ञान मिळविले हे बाहेरील जगातून स्वतःहून अक्षरफोड करून घेतली. १९३२ साली वडिलांसोबत मुंबईला आले. चरितार्थासाठी कोळसे वेचने, फेरीवाल्यांच्या पाठीशी गाठोडे घेऊन हिंडणे, मुंबईच्या मोरबाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी केली, अशी अनेक मिळतील ती कामे त्यांनी केली. मुंबईत कामगारांचे कष्टमय, दुःखाचे जीवन त्यांनी पाहिले.

त्यांचे संप, मोर्चे पाहून त्यांचा लढाऊपणाही त्यांनी अनुभवला. आणि नियतीने वेगळेच रूप दाखवले वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची सगळी जबाबदारी अंगावर पडल्याने ते पुन्हा आपल्या गावी आले. तेथे बापू साठे या चुलत भावाच्या तमाशाच्या फडात ते काम करू लागले. पुढे १९४२ च्या चळवळीत सहभागी झाल्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर पकड वॉरंट काढले. पोलिसांना चुकवीत ते मुंबईला आले. मुंबईत लोकशाहीर म्हणून त्यांचा लौकिक झाला. त्यावेळी अमर शेख या ख्यातनाम मराठी लोकशाहीरांबरोबर अण्णाभाऊंचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले. त्यांनी लिहिलेला 'स्तालिनग्राडचा पोवाडा' १९४३ साली पार्टी या मासिकात प्रसिद्ध झाला.

त्यांनी १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने 'लालबावटा' कलापथक स्थापन केले. बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. । जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव । हे त्यांचे गीत खूप गाजले. त्यांनी लिहिलेल्या लावण्यात 'माझी मैना गावावर राहिली', आणि 'मुंबईची लावणी' या अजोड आणि अविस्मरणीय आहेत. अतिशय तळमळीने लिहिण्याची त्यांची वृत्ती होती. 'पृथ्वीही शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे', असे ते म्हणत ; आणि हाच त्यांच्या लेखनाचा प्रेरणास्त्रोत होता. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख दारिद्र्य, त्यांच्या साहित्यातून प्रकट होत होते. अण्णाभाऊंची निरीक्षण शक्ती सूक्ष्म होती. त्यांच्या लेखन शैलीला मराठमोळा, रांगडा पण लोभस घाट आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठात अण्णाभाऊ ११ प्रबंध सिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ 'अण्णाभाऊ साठे' अध्यासन सुरू करण्यात आले आहे. त्यांच्या कथा कादंबऱ्या केवळ भारतीयच नव्हे तर, बावीस परकीय भाषात भाषांतरित झाल्या आहेत. आज मातंग समाजासाठी अनेक योजना अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने मिळत आहेत, आर टी ची स्थापना झाल्यामुळे विद्यार्थ्यांना याचा आर्थिक फायदा होत आहे. फक्त आता अण्णाभाऊंना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात यावे फक्त एवढीच महाराष्ट्रातील मातंग समाजाची अपेक्षा आहे. तलवाडा सारख्या छोट्या गावात अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यात आलेला आहे याचा गेवराई तालुक्यातील मातंग समाजाला अभिमान वाटत आहे.अण्णाभाऊ साठे जन्मोत्सव २०२५ संपूर्ण भारतभर साजरा करण्यात येत आहे, अशा या महामानवाला त्यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त नतमस्तक होऊन विनम्र अभिवादन करतो.



## अल्ट्राटेक तर्फे शुभारंभ मोठ्या उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । पाटोदा

नागरिकांना गृहनिर्माणाच्या वाटचालीत प्रत्येक पावलाचा साथीदार अल्ट्राटेक ठरला असुन अल्ट्राटेक सिमेंटने ग्राहकांच्या प्रत्येक गरजेच्या पूर्ततेसाठी 'अल्ट्राटेकशुभारंभ' चा भव्य कार्यक्रम हाटेल ग्रंड यशोदा बीड येथे दि २६ शनिवार रोजी आयोजित केले होते. या कार्यक्रमांमध्ये सर्व प्रकारचे बांधकाम संबंधित स्टॉल लावून ग्राहकांना बांधकामाच्या संबंधित नवीन आदर्श बांधकाम कसे असावे यासंदर्भात अतिशय उपयुक्त माहिती देण्यात आली या कार्यक्रमास इंजिनिअर , बांधकाम कामगार, पेंटर व ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला गृहनिर्माण क्षेत्रातील आधुनिक उत्पादने व सेवा तसेच बांधकाम क्षेत्रातील विविध समस्यांवर चर्चा, ग्राहकांना उत्पादनांची विस्तृत माहिती,नवनवीन तंत्रज्ञान आणि तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांचे घर बांधण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी देशाचे अग्रगण्य अल्ट्राटेक सिमेंट नेहमीच कटिबद्ध आहे हे पुन्हा सिद्ध झालंय. यावेळी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कंपनीचे एरिया सेल्स मॅनेजर जसपाल सिंग, रैट टेकनिकल रिजनल हेड बाळकृष्ण कुलकर्णी, एरिया टेक्निकल मॅनेजर प्रसाद तापडिया, सेल्स ऑफिसर मोहसीन कुरेशी, स्वप्निल राठोड,वैभव चव्हाण व सर्व अल्ट्राटेक टीम परिश्रम घेतले नागरीकांच्या उस्फुर्त प्रतिसादाने कार्यक्रम यशस्वी झाला याप्रसंगी नागरिक,विक्रेते आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रांती महिला असंघटित कामगार युनियन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मनरेगाच्या कामात महिलांचा सहभाग व रोजगार निर्मिती कार्यक्रम संपन्न

प्रतिनिधी । गेवराई

दि.२५ जुलै क्रांती महिला असंघटित कामगार युनियन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मनरेगाच्या कामात महिलांचा सहभाग व रोजगार निर्मिती तसेच महिला कार्यकर्त्यांना प्रशिक्षण कार्यक्रम ठेवण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती कुटे मॅडम नायब तहसीलदार गेवराई तर प्रमुख पाहुणे विलास मगरे सर विभागीय समन्वयक (कोरो इंडिया), आप्पासाहेब कानगुडे नगरसेवक गेवराई,श्रीमती शारदा डोईजड मॅडम,श्री मनोहर चाळक साहेब सामाजिक कार्यकर्ते गेवराई,एडवोकेट संदेश पोतदार साहेब,बंडू खरात,अनिल आबा मस्के रोजगार सेवक हे होते.

महात्मा गांधी रोजगार हमी योजने मध्ये ग्रामीण भागातील महिलांचा सहभाग या आधारे त्यांना रोजगार मिळवून देऊन त्यांना त्यांच्या संसारात आर्थिक आधार मिळवुन देण्यास व रोजगार देण्यास ग्राम पंचायत कडे नमुना नंबर ४ मध्ये अर्ज कसा करायचा याबद्दल सविस्तर माहिती दिली.पंचायत समिती कडून सरकारी नियमानुसार शंभर दिवस रोजगाराची हमी



असल्यामुळे ज्यांना रोजगाराची आवश्यकता आहे अशा ग्रामीण भागातील महिला मजूर व इतरांना रोजगार मिळू शकतो याचीही माहिती व आपले हक्क आपले अधिकार याची माहिती दिली.महिला सक्षमीकरण व आर्थिक विकास याची सविस्तर माहिती श्रीमती शाहीन असलमखाँ पठाण यांनी सर्व महिलांना त्याची सविस्तर माहिती दिली.श्रीमती शारदा डोईजड मॅडम यांनी जमलेल्या महिलांना पीएम विश्वकर्मा योजना व पीएम किसान कौशल्य विकास योजना यांची सविस्तर प्रशिक्षण कसे प्राप्त करून घ्यावे व बँक लोन साठी कागदपत्राची पूर्तता कशी करावी याची माहिती दिली.श्रीमती कुटे मॅडम नायब तहसीलदार गेवराई यांनी आलेल्या महिलांना तहसीलच्या अनेक योजनाची सविस्तर माहिती दिली.श्री मनोहर चाळक सामाजिक कार्यकर्ते गेवराई यांनी जमलेल्या महिलांना प्रत्येक योजनेचा लाभ कसा घ्यावा व त्यासाठी आपली कुठेही अडवणूक झाली तर पूर्ण मदत करण्याची हमी व ते काम पूर्ण होईपर्यंत त्याचा पाठपुरावा करण्याची हमी आपल्या भाषणातून व्यक्त केली आहे.श्री एडवोकेट संदेश पोतदार साहेब यांनी एकल महिला,विधवा महिला,दिव्यांग महिला यांना कोर्ट दरबारी कोणतीही अडचण निर्माण झाली तर त्यासाठी लागणारे कागदपत्र व कायदेशीर सल्ला देण्याचे आपल्या भाषणात व्यक्त केले आहे.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.तुकाराम गवारे पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती शीतल गोचडे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गवारे पाटील,मनीषा शरणागत,अंजुम इसाक सय्यद,शकुंतला घुन्गासे,धापसे मॅडम,स्वर्णा मस्के,वहिदा शेख,मोहन धुरन्दरे,शेख नफीस,शेर-ए-हिंद ब.उ.से.संस्थाचे संस्थाप्रमुख

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड – ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com